# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

Dr. Naresh M. Madavi
Director(I/c.)
Ph. No. - 07132-223104

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/NSS/ 554 /2018** **Dt: 12 /12/2018**

प्रति,

मा. प्राचार्य/रासेयो कार्यक्रम अधिकारी,
संलग्नीत रासेयो महाविद्यालये, (गडचिरोली जिल्हा)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली,

**विषय: महीला महाविद्यालय, गडचिरोली येथे युवक बिरादरी व्दारा आयोजीत अभिरुप युवा संसदेमध्ये रासेयो स्वंयसेवक/स्वंयसेविकाना पाठविण्याबाबत.**

**संदर्भ: म.म.म/गडचिरोली ४२९/२०१८ दि. १०/१२/२०१८ चे पत्र.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयांकीत संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, दिनांक १५/१२/२०१८ रोजी सकाळी ९:३० वाजता महीला महाविद्यालय, गडचिरोली, येथे युवक बिरादरी व्दारा आयोजीत **अभिरुप युवा संसदेचे** आयोजन करण्यात आलेले आहे, करीता आपल्या महाविद्यालयातील रासेयो स्वंयसेवक/स्वंयसेविकांना सहभागी होण्यास प्रोत्साहीत करावे.

धन्यवाद!

**(टिप—दिनांक १४ डिसेंबर २०१८ पर्यंत प्रा. प्रज्ञा त्रिपाटी रासेयो कार्यक्रम अधिकारी, महीला महाविद्यालय गडचिरोली यांच्याशी संपर्क साधून आपला सहभाग निश्चित करावा. tripathipragya2380@gmail.com संपर्क क्रमांक ९४२३०६५३०१)**

डॉ. नरेश मडावी
संचालक (प्र.)
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

Shri Vile Parle Kelavani Mandal

Shri. Kisanlal Sarada Pratishthan

# Yuva Bhushan

## Movement and Competition 2018-19
## Organised By Yuvak Biradari (Bharat)

Regional Organiser

Courtesy

*Dear Youth of India,*
*This is your chance to:*

| | |
|---|---|
| Bring out | your hidden potential |
| Shine out | among the crowd |
| Prepare for | your personal and career growth |
| Participate for | testing yourself |
| Get mentored | to help you scale new heights |
| Get rewarded | for your efforts and merit |
| Instill in you | democratic values |
| Enhance in you | understanding of sustainable development |
| Build your | attitude and values |
| Develop your | leadership !!! |

**Concept -** Our volatile, uncertain and complex world will sustain when the next generations who enter the world of work will be well-rounded individuals with a strong base of human values, knowledge and required skills. We also need to have a youth generation which acts in a responsible and sustainable way in their personal lives as well as occupational pursuits. With this objective a unique competitive process and movement has been conceptualized by Yuvak Biradari in which youth vie for a title of 'Yuva Bhushan'. It is an annual competition conducted by Biradari with regional host partners.

**Eligibility –** Youth in the age group of 16 and 25 years.

**Application process –** Completion of online application form on www.biradari.org between 31 October and 14 November 2018. The students who are unable to register online can make a spot application at the Regional Centre on the date of the competition. Registration fee of Rs.50 is payable at the Regional exam centre. The Regional Round will take place either on 19 November 2018 or on 8 December 2018 depending on the academic calendar of the host organisation. List of regional exam centres will be released after 31 October 2018 on www.biradari.org

**Regional Competition Process** (on 19 Nov. OR 8 Dec. 2018) : Round 1 : Aptitude test (150 marks) and Values Self Assessment (25 marks). Students securing 75 and above in the Aptitude test or the top one-third scorers of the batch will qualify for Round 2 which will consist of Group Discussion (25 marks), Personal Interview (25 marks) and Physical Fitness (25 marks). Aptitude test will have 75 multiple choice questions based on General Knowledge, Logical Reasoning, Data Interpretation, Comprehension, Decision Making, Problem Solving, Current Affairs.

**Regional Competition Schedule :** Reporting & Registration 9.00 am. Inauguration 10.15 to 11.00 am. Aptitude test and Values Self Assessment : 11.15 am to 12.30 pm. Group Discussion and Interview : 1.15 to 3.30 pm. Fitness Test : 3.30 to 4.30 pm. Evaluation parameters for Physical Fitness will be the shortest possible time to run 400 meters for boys and 200 meters for girls. Alternative evaluation criteria is put in place for specially abled persons who cannot participate in the fitness test, provided they bring a medical certificate with them.

**Regional Competition Result :** On the basis of Round 1 and 2 the top three meritorious participants at each Regional Centre scoring above 150 marks out of the Total 250 Marks will receive cash prizes of Rs. 5,000, Rs. 3,000 and Rs. 2,000. In case participants do not cross the designated cut-off then three students with the highest marks will receive Rs. 1,000 each as consolation prize.

**Final Competition Process** (in Mumbai on 12 Jan. 2019) : The top two meritorious prize winners from each Regional Competition will participate in the Final Round in Mumbai on 12 January 2019. This will consist of Aptitude Test (40 marks), Group Discussion (30 marks) and Personal Interview (30 marks) which will be conducted from 9 am to 2 pm. All finalists will receive certificates and the top three winners will receive cash prizes of Rs. 50,000, Rs. 30,000 and Rs. 20,000.

***Note : (i) Top three prize winners at the Mumbai Yuva Bhushan Finals of the previous years may not participate in the competition again.***

***(ii) All rights of admission and evaluation in the competition are reserved with the organisers. They cannot be challenged on any forum.***

**Advisory Committee:** Govind Swarup (former Principal Secretary, Govt. of Maharashtra), Sudhir Thakre (former Chairperson – Maharashtra Public Service Commission), Sunil Rohokale (M.D. & CEO, ASK Group)

**Programme Committee:** Swar Kranti, Ashutosh Shirke, Leena Shete, Sunil Valavalkar, Pooja Serai

Yuvak Biradari (Bharat), Hazarimal Somani Marg, Mumbai - 400 001.
Phone - 022 22075592 Email - info@biradari.org Website : www.biradari.org

**Follow us on:**

**https://www.facebook.com/yuvakbiradaribharat/ Twitter handle : @YuvakBiradari https://www.instagram.com/yuvak_biradari/**

Regional Committee :

श्री विले पारले केळवणी मंडळ

श्री. किसनलाल सारडा प्रतिष्ठान

# युवा भूषण

## अभियान व स्पर्धा २०१८-१९

## युवक बिरादरी (भारत) द्वारा आयोजित

विभागीय आयोजक

सौजन्य

जगातील सर्वात मोठ्या युवा भारतात बहुसंख्य युवकांना आपल्या भविष्याचा मार्ग स्वत:लाच शोधायचा आहे. स्वाभिमानाने पुढे जायचे आहे. विद्यार्थी युवाजीवनात प्राप्त झालेले मर्यादित पुस्तकी ज्ञान, भोवतालच्या वातावरणातून कळत-नकळत मिळालेले तुटपुंजे अनुभव, निरीक्षणे व जन्माने मिळालेली सामाजिक वास्तवता यांतून स्वत:चे मूल्यमापन करून नोकरी, सेवा, व्यवसाय, उत्पादक, उद्योग यांपैकी कोणत्या तरी क्षेत्रात पदार्पण करायचे आहे. स्पर्धा प्रचंड आहे पण संधीही अनेक प्रकारच्या आहेत. स्वप्नांना मूर्त रूप देण्यासाठी टप्प्याटप्प्यावर कसोटी सिद्ध करत पुढे सरकायचे आहे.

आपल्या वैयक्तिक आणि कार्यक्षेत्रातील जबाबदाऱ्यांचा विकास साधून आत्मपरीक्षण घडविण्याची, अधिक उच्च स्तरावर कार्यान्वित होण्याची आणि आपल्या प्रयत्नांना तसेच अंगभूत कौशल्यांना सन्मान प्राप्त करून देण्याची संधी देशातील विविध नगरांत एकाच दिवशी युवकांना प्राप्त होणार आहे. युवकांच्या कौशल्यांनाच नव्हे तर संकल्पना, शारीरिक क्षमता व आवश्यकतेनुसार प्रतिसाद देण्याची क्षमता यांना समाजात वैशिष्ट्यपूर्ण स्थान लाभणार आहे. १६ ते २५ वयोगटातील युवक या स्पर्धेत सहभागी होऊ शकणार आहेत.

युवा भूषण परीक्षा पद्धतीत व आयोजन पद्धतीत बदल करण्याचे व अंतिम फेरीच्या आयोजनाचे सर्व अधिकार युवक बिरादरीकडे राहतील व विभागीय स्तरावरील स्पर्धाप्रवेश व स्पर्धेचे मूल्यमापन यांचे अधिकार विभागीय आयोजक संस्थेकडे असतील. त्यांना आव्हान देता येणार नाही.
**नोंदणी पद्धत -** ३१ ऑक्टोबरला स्पर्धा सेंटर्सची सूची www.biradari.org या वेबसाईटवर देण्यात येईल. ३१ ऑक्टोबर ते १४ नोव्हेंबरपर्यंत बिरादरीच्या वेबसाईटवर इच्छुक ऑनलाईन फॉर्म भरू शकतात. ऑनलाईन नावे नोंदविण्यास असमर्थ ठरलेल्या युवकांना जागेच्या उपलब्धतेनुसार विभागीय सेंटरवर नावे नोंदविण्याची मुभा देण्यात येईल. नावे नोंदविण्यासाठी परीक्षा केंद्रावर रु. ५०/- पर्यंत शुल्क घेतले जाईल. 'युवा भूषण'ची प्राथमिक फेरी सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत संपन्न होईल.
**स्पर्धा आयोजनाचा तपशील -** स्पर्धेची प्राथमिक फेरी युवक बिरादरी (भारत) तर्फे विभागीय सहयोगी संस्थांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येईल. प्राथमिक फेरीसाठी सकाळी १०.१५ ते ११.०० पर्यंत औपचारिक उद्घाटन कार्यक्रम असेल. त्यानंतर अभिव्यक्ती तपासणी (ॲप्टीट्यूड टेस्ट) व मानवी मूल्य तपास करण्याची परीक्षा होईल. अभिव्यक्ती तपासणीमध्ये सामान्य ज्ञान, सर्वसाधारण विचार करण्याची क्षमता, विधान (डेटा) आकलन, समज, निर्णयपात्रता, समस्या सोडवण्याची कला, चालू घडामोडींची माहिती या विषयांवरील ७५ प्रश्नांची परीक्षा असेल. अभिव्यक्ती परीक्षेत किमान ७५ गुण प्राप्त करणारे किंवा एकूण परीक्षार्थींपैकी १/३ (एक तृतियांश) टॉपर्स पुढील फेरीत पोहचतील. त्याचबरोबर स्वयंमूल्यांकनासाठी २५ गुणांची स्वतंत्र चाचणी असेल. दुसऱ्या फेरीत समूहचर्चा आणि मुलाखती घेतल्या जातील. शारीरिक क्षमता चाचणीत मुलांसाठी व मुलींसाठी अनुक्रमे ४०० मीटर व २०० मीटर धावण्याची स्पर्धा घेतली जाईल. शारीरिक पात्रता स्पर्धेत शारीरिक अक्षमतेमुळे सहभागी होऊ न शकणाऱ्या स्पर्धकांसाठी मेडिकल सर्टिफिकेट दाखवल्यास वेगळे निकष लावण्यात येतील.

पाच घटकांतील म्हणजे अभिव्यक्ती चाचणी, समूहचर्चा, मुलाखती, शारीरिक पात्रता आणि मानवी मूल्यांच्या निकषांवर मिळून २५० गुणांपैकी १५० गुण मिळविणाऱ्या युवकांना आवश्यकता भासल्यास क्रमवारीसाठी ४.३० ते ५.०० या वेळेत अंतिम समूह मुलाखतीस सामोरे जावे लागेल.

**Regional Competition Process** (on 19 Nov. OR 8 Dec. 2018) : Round 1 : Aptitude test (150 marks) and Values Self Assessment (25 marks). Students securing 75 and above in the Aptitude test or the top one-third scorers of the batch will qualify for Round 2 which will consist of Group Discussion (25 marks), Personal Interview (25 marks) and Physical Fitness (25 marks). Aptitude test will have 75 multiple choice questions based on General Knowledge, Logical Reasoning, Data Interpretation, Comprehension, Decision Making, Problem Solving, Current Affairs.

**Regional Competition Schedule :** Reporting & Registration 9.00 am. Inauguration 10.15 to 11.00 am. Aptitude test and Values Self Assessment : 11.15 am to 12.30 pm. Group Discussion and Interview : 1.15 to 3.30 pm. Fitness Test : 3.30 to 4.30 pm. Evaluation parameters for Physical Fitness will be the shortest possible time to run 400 meters for boys and 200 meters for girls. Alternative evaluation criteria is put in place for specially abled persons who cannot participate in the fitness test, provided they bring a medical certificate with them.

**Regional Competition Result :** On the basis of Round 1 and 2 the top three meritorious participants at each Regional Centre scoring above 150 marks out of the Total 250 Marks will receive cash prizes of Rs. 5,000, Rs. 3,000 and Rs. 2,000. In case participants do not cross the designated cut-off then three students with the highest marks will receive Rs. 1,000 each as consolation prize.

**Final Competition Process** (in Mumbai on 12 Jan. 2019) : The top two meritorious prize winners from each Regional Competition will participate in the Final Round in Mumbai on 12 January 2019. This will consist of Aptitude Test (40 marks), Group Discussion (30 marks) and Personal Interview (30 marks) which will be conducted from 9 am to 2 pm. All finalists will receive certificates and the top three winners will receive cash prizes of Rs. 50,000, Rs. 30,000 and Rs. 20,000.

***Note : (i) Top three prize winners at the Mumbai Yuva Bhushan Finals of the previous years may not participate in the competition again.***

***(ii) All rights of admission and evaluation in the competition are reserved with the organisers. They cannot be challenged on any forum.***

**Advisory Committee:** Govind Swarup (former Principal Secretary, Govt. of Maharashtra), Sudhir Thakre (former Chairperson – Maharashtra Public Service Commission), Sunil Rohokale (M.D. & CEO, ASK Group)

**Programme Committee:** Swar Kranti, Ashutosh Shirke, Leena Shete, Sunil Valavalkar, Pooja Serai

Yuvak Biradari (Bharat), Hazarimal Somani Marg, Mumbai - 400 001.
Phone - 022 22075592 Email - info@biradari.org Website : www.biradari.org

**Follow us on:**

**https://www.facebook.com/yuvakbiradaribharat/ Twitter handle : @YuvakBiradari https://www.instagram.com/yuvak_biradari/**

Regional Committee :




## राष्ट्रीय / राज्य स्तरीय स्पर्धात्मक अभियान (१० डिसेंबर २०१८ ते १२ जानेवारी २०१९ दरम्यान)



**संकल्पना :** युवक बिरादरी (भारत) द्वारा विविध शैक्षणिक व युवा विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात. कलाक्षेत्राप्रमाणेच सामाजिक बांधिलकी, बंधुता, अखंडता अशा विविध विषयांवर ही संस्था कार्यरत आहे. याचाच एक भाग म्हणजे अभिरूप युवा संसद. युवकांमध्ये लोकशाही मूल्यांचे संस्कार, संसदीय पद्धतीचा आचार, दूरगामी विचार, हजरजबाबीपणा, वक्तृत्व व वाद-संवाद या गुणांच्या वृद्धीबरोबर सकारात्मक दृष्टिकोन वाढावा म्हणून भारतीय घटनेच्या सरनाम्यातील उद्घोषांचा आदर राखून, सार्वभौम भारताच्या एकात्मतेसाठी जनसामान्यांच्या आकांक्षांना मूर्तरूप येईल, अशी या उपक्रमामागची भूमिका आहे. ग्रामपंचायतीपासून संसदेपर्यंत कार्यरत असणाऱ्या लाखो लोकप्रतिनिधींच्या परंपरेत, विचारांत प्रामाणिकपणा, आचारात स्वच्छता, जनतेच्या आशा-आकांक्षांशी एकरूपता, आदी गुणांच्या विकासासाठी उत्स्फूर्त नाट्यमय माध्यमातून संसदेची कार्यपद्धतीशी ते अवगत व्हावेत व त्यांना प्रत्यक्ष कार्याचा घटक बनता यावा, यासाठी अभिरूप युवा संसद ही स्पर्धा घेतली जाते.

**अपेक्षित योजना :** १) अभिरूप युवा संसदेसाठी २५ व्यक्तींचा संघ असावा. त्यात सत्तारूढ पक्षाचे ८ ते १० आणि विरोधी पक्षाचे ७ ते ९ सदस्य असतील. सभापती, सभापतींना साहाय्यक सेवक, संसदीय सचिव, मार्शल आणि चोपदार हे इतर असतील. २) अभिरूप युवा संसदेची रचना अर्धवर्तुळाकार असावी. सभापतींचे आसन उंचावर असावे. सभापतींच्या आसनासमोर संसदीय सचिव, कामकाजाच्या नोंदी घेण्यासाठी व संसदीय कामकाज पद्धतीबाबत नियमांची जाण असणारी व्यक्ती असेल. सभापतींच्या पाठिशी उभी असणारी व्यक्ती ही सभापतींना आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता करणारी व्यक्ती असेल. सभापतींच्या उजव्या बाजूला सत्तारूढ पक्ष तर डाव्या बाजूला विरोधी पक्ष असावा. मार्शल ही सभागृहात शांतता व सुव्यवस्थेसाठी सभापतींच्या आदेशावर कार्य करणारी व्यक्ती असेल. सत्तारूढ-विरोधी पक्षाच्या रांगेमध्ये खूर्च्यांच्या समोर टेबलांची व्यवस्था असावी. प्रत्येकी दोन रांगेत सत्तारूढ व विरोधी पक्ष बसलेला असावा. ३) राज्यभाषा, राष्ट्रभाषा व इंग्रजी (अपवादात्मक) या तीन भाषेत सभागृहाचे कामकाज चालू शकेल. ४) युवा संसदेचे कामकाज साधारणत: ७५ मिनिटांपर्यंत असावे. हे कामकाज दोन भागात चालेल. सभापतींचे आगमन होताच जनगणमन या राष्ट्रगानने सभागृहाचे कामकाज सुरू होईल. ५) पहिल्या भागात प्रश्नोत्तराचा तास असेल. २०/३० मिनिटांचा कालावधीत दोन-तीन प्रश्नांवर चर्चा व्हावी. प्रश्न व तो प्रश्न विचारण्यामागील भूमिका मांडल्यावर सत्ताधारी पक्षातील मंत्र्यांकडून योग्य त्या उत्तरांची अपेक्षा असेल. ६) दुसऱ्या भागात पंतप्रधानांद्वारे शासकीय वा कोणत्याही खासदाराकडून अशासकीय विधेयक मांडले जाईल. हे विधेयक देशाच्या भवितव्याशी निगडित असणारे आणि घटनेत दुरुस्ती करण्यास भाग पाडणारे, खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर आधारित असेल. याद्वारे ते सदनात विधेयकासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट करतील. ७) त्यानंतर सत्तारूढ व विरोधी पक्षांतील तीन-तीन सदस्य या विधेयकांसंदर्भात आपले विचार मांडतील. सभापती या विधेयकावर आपला निर्णय देऊन सदनाची कार्यवाही सत्रासाठी थांबवतील.

**अपेक्षित विधेयकांचे विषय : १) राष्ट्रस्तरीय भ्रष्टाचार मुक्त प्रशासनाच्या संदर्भात... (उदा. लोकपाल विधेयक), २) भारताच्या स्वातंत्र्याला १०० वर्ष झाल्याप्रीत्यर्थ सन २०४७ पासून जातपात आरक्षण मुक्त भारताच्या संदर्भात... (अपवाद - निराधार / अपंग घटक), ३) वसुंधरा संरक्षणासाठी राष्ट्रीय नीतिच्या संदर्भात..., ४) किसान सुरक्षेसाठी कृषिविषयक नवीन धोरण ठरविण्याच्या संदर्भात..., ५) अभिव्यक्ति स्वातंत्र्याच्या संदर्भात नवीन नीती ठरविण्याबाबत..., ६) राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक ऐक्यविषयक नवीन राष्ट्रीय नीतिच्या संदर्भात..., ७) अनिवार्य प्राथमिक शिक्षणानंतर समान संधीसाठी राष्ट्रीय विकासाच्या दिशादर्शनात रोजगार व मानवीय मूल्य पूरक शिक्षणप्रणालीच्या संदर्भात...**

**अपेक्षित सहभागी :** शैक्षणिक संस्था / युवा किंवा सामाजिक संस्था समूह, **वयोमर्यादा :** १६ ते २५ वर्षे, **निवेदन पत्र :** संस्था प्रमुख / समूह प्रमुख यांच्याद्वारे येणे अपेक्षित

**स्पर्धेचे वेळापत्रक : भाग १ : एलिमिनेशन राऊंड :** १० डिसेंबर ते १५ डिसेंबर दरम्यान आपल्या सोयीनुसार कोणत्याही एके दिवशी स्थानिक शैक्षणिक संस्थेअंतर्गत सादरीकरणाचे व्हिडिओग्राफी करून १६ डिसेंबरपर्यंत info@biradari.org या ई-मेलवर पाठवावी. त्याआधारे प्रत्येक जिल्ह्यातील एका गुणवत्तापूर्ण समूहाला विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी आमंत्रित केले जाईल. १० डिसेंबर ते १५ डिसेंबर २०१८ दरम्यान होणाऱ्या या एलिमिनेशन राऊंडची माहिती, सादरीकरणाचे स्थळ (शैक्षणिक संस्था), तारीख, वेळ याची माहिती ५ डिसेंबर २०१८पर्यंत द्यावी जेणेकरून युवक बिरादरीचे प्रतिनिधी त्या दरम्यान स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित राहू शकतील. शक्य झाल्यास सोबत दिलेल्या तारखांना अभिरूप युवा संसदेचे प्रस्तुतिकरण करू शकल्यास आनंद वाटेल. अर्थात हे बंधनकारक नाही.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० डिसें. | पालघर | पुणे | भंडारा-गोंदिया | नाशिक नगर | औरंगाबाद |
| ११ डिसें. | ठाणे | सातारा | गडचिरोली-चंद्रपूर | अहमदनगर-नाशिक | औरंगाबाद-बीड |
| १२ डिसें. | रायगड | कोल्हापूर | यवतमाळ-वर्धा | धुळे | जालना-परभणी |
| १३ डिसें. | रत्नागिरी | सांगली | नागपूर | नंदूरबार | हिंगोली-नांदेड |
| १४ डिसें. | सिंधुदुर्ग | सोलापूर | अमरावती-अकोला | जळगाव | नांदेड-लातूर |
| १५ डिसें. | मुंबई | — | वाशिम-बुलढाणा | — | उस्मानाबाद |